सोलापूर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.९५९ ठ. क्र. ९३२ दि. ३१/८/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात गणपती, नवरात्रोत्सव, रमजान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, छ. शिवाजी महाराज जयंती, १४ एप्रील (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्व धार्मिक उत्सव, सणा वेळी मंडप उभारणेकामी परवानगी देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे उल्हासनगर व ठाणे महानगरपालिकेने तयार केलेले मार्गदर्शक तत्वे तयार केलेली आहेत. त्याची ई-मेलद्वारे माहिती मागविणेत आलेली असून, तेही प्रकरणी जोडलेली आहेत. त्याअनुषंगाने सण साजरे करता पर्यावरणाचा -हास होणार नाही व ध्वनी प्रदुषण होणार नाही, रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही व मा. उच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे सार्वजनिक मंडळाकडून मंडप घालणेकामी उचित पालन होण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखून जनजीवन विस्कळीत होऊ न देता जनहितार्थ मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहेत व ते प्रकरणासोबत जोडलेले आहे. त्याचे अवलोकन होऊन तसेच त्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेकडून कार्यवाही करणेस व प्रकरणी नमूद संदर्भ क्र. १ व २ मध्ये असणारे तरतुदीनुसार अंमलबजावणी करणेस तातडीने दिनांक ३० जुलै २०१५ अगोदर विशेष सभा बोलावून मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दिनांक २४-७-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात गणपती, नवरात्रोत्सव, रमजान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, छ. शिवाजी महाराज जयंती, १४ एप्रील (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन) व सर्व धार्मिक उत्सव, सणा वेळी मंडप उभारणेकामी परवानगी देणेबाबत मा. आयुक्त यांनी सोलापूर महानगरपालिकेकरिता तयार केलेले अ.क्र. १ ते २७ मार्गदर्शक तत्वामधील अ.क्र. २ व १३ वगळून मान्यता देणेत येत आहे.

अ.क्र. २ व १३ मधील मार्गदर्शक तपशीलाऐवजी खालीलप्रमाणे बदल करुन कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रात ज्या ठिकाणी रस्त्यावर दुभाजक आहे डाव्या अथवा उजव्या अशा ठिकाणी ५० टक्के मंडप उभारणेस परवानगी देणेस, तसेच ज्या ठिकाणी दुभाजक नाहीत त्याठिकाणीही ५० टक्के मंडप उभारणेस परवानगी देणेस आणि ॲम्ब्युलन्स व फायर ब्रिगेड या वाहनास रस्ता रहदारीस खुला ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरची अंमलबजावणी दिनांक १ मे २०१६ पासून करणेस, त्याप्रमाणे कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका